औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,

कामगार भवन, ५वा मजला, ब्लॉक-ई, सी-२०, वान्द्रे-कुर्ला संकुल, वान्द्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

फोन नं. २६५७२५०४/०९/२२/५८, फॅक्स नं. २६५७२४७४ Email dish.maharashtra@gmail.com

क्र.औसुवआ/आस्थापना/११६२०-२३/२-अ

दिनांक :- 28 SEP 2017

# परिपत्रक क्र.३/२०१७

ऑनलाईन पध्दतीने कारखाना नोंदणी व परवाना देणे,परवाना नुतनीकरण करणे व नकाशे मंजूर करणेच्या कार्यपध्दतीमध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

यापुर्वी कारखाना नोंदणी व परवाना देणे,परवाना नुतनीकरण करणे व नकाशे मंजूरी करीता ऑनलाईन पध्दतीने नमुना क्र.१ मध्ये माहिती भरुन झाल्यानंतर त्याचे प्रिंटआउट काढून त्यावर भोगवटादार व व्यवस्थापक यांची स्वाक्षरी घेऊन त्याची हार्ड कॉपी कार्यालयात सादर करण्यात येत होती.

आता यापुढे कारखाना व्यवस्थापनामार्फत ऑनलाईन पध्दतीने नमुना क्र.१ मध्ये माहिती भरुन झाल्यानंतर त्याचे प्रिंटआऊट काढून त्यावर भोगवटादार व व्यवस्थापक यांची स्वाक्षरी घेऊन सदर नमुना क्र.१ पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अपलोड करण्यात येणार आहे. त्यानुसार आता कारखाना व्यवस्थापनाकडून कोणत्याही कागदपत्रांच्या हार्डकॉपीज घेण्यात येणार नाहीत व ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जानुसार कार्यवाही करण्यात येईल.

तसेच नकाशे मंजुरीकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यानंतर नकाशांच्या २ प्रती स्पीडपोस्ट किंवा कुरीअर ट्रॅकिंग पध्दतीने कार्यालयास पाठविण्याबाबत सुचना कारखाना व्यवस्थपानास देण्यात याव्यात.

सदर परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच एक प्रत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात यावी.

प्रभारी संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत-
अपर / सह संचालक,
मुंबई/नागपूर/पुणे-१/पुणे-२/पुणे-३/ठाणे/वसई/कल्याण
रायगड/नाशिक/औरंगाबाद/कोल्हापूर/अकोला/शाखा क्र.८ सांख्यिकी